स. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ७५५८
२१७ १९३५

मुलांमुलींचा [ सन १९३५

# [illegible] सर्कल मेळा, पुणें

मेळ्याची एकनिष्ठ सेविका व गायिका



पारगे

चि. कु. वत्सला कुलकर्णी

संस्थापक व प्रकाशक,

वामन यशवंत ऊर्फ आप्पासाहेब बरडे,

( कवि–लक्ष्मीकांत )

किंमत २ पैसे

REFBK-0005372

॥ श्रीगजानन प्रसन्न ॥

# फॅमिली सर्कल मेळा, पुणें.

## १९३७ सालची पद्यावली.

५३७२.
REFBK-0005372
REFBK-0005372
स्थळ प्रत
क्रमांक २७०३
ता. २१।४।३७
ठाणें.
७७२८

चाल:—भर न जाती ] नमन [ ताल:—झपताल

नमन देवा करीत पदीं ।
दीन मी अति पतित तारी मजसि ॥ धृ० ॥

हे शारदा कांत । ना अन्य जगतात ।
कोणी मजसि या । शिव कुमारा ॥ १ ॥

—वेचलेकर

———

पद २ रें. (कु. कलावती बरडे)

अहा माझी बाहुली किती तरी छान ॥ धृ० ॥

न्हाऊं मी घालीन । खाऊं ही देईन ।
कपले मी शिवीन । छान छान छान ॥ १ ॥

माती कुती कलीन । लाथी काथी फ़्लवीन ।
देशासी सेवीन । पहा पहा पहा ॥ २ ॥

—लक्ष्मीकांत

———

पद ३ रें. (कु. प्रभावती बरडे, कु. नलीनी गुप्ते.)

प्रेमें खेळूं चला सोडूनी काम काजतें ॥ धृ० ॥
बालपणींचे दिवस क्षणाचे । जाती निघोनी ते सखये ॥ १ ॥
होईल केव्हां भेट कधीं गें । जाण सुदिन तोचि । सखये ॥ २ ॥

-लक्ष्मीकांत

---

पद ४ थें (कु. लिला अकोलकर)

भ्रमली मती कां मनुजा । हरली स्मृति कां मनुजा ॥ धृ० ॥
गगनि दाटला करुण नाद हा । गाईचा मनुजा ॥ १ ॥
प्राण वांचवि काम धेनुचा । सुखविल तव मनुजा ॥ २ ॥

-बेलह्याळ

---

पद ५ वें. (कु. सुशिला अवचट)

गिरीजा सुता सुखवा अतां ।
नच पोशिता या भारता ॥ धृ० ॥
परदास्यता ही साहता । जगतीं नसे या मान्यता ।
बसुनि कसे अवलोकिता ॥ १ ॥

-बेलह्याळ

---

पद ६ वें. (कु. प्रमिला वाबोलीकर)

घेशिल धांव कधीं गणराया । मारेत हांका भारत भू या ॥ धृ०
सर्वा आधीं मानवि अपुला । विसरलास कां तूंच मोरया ॥ १ ॥
सकल जन हें अर्पुनि देहा । मिळवितील कीं स्थान ही पायां ॥ २ ॥
तव भक्तांचा प्राण चालला । परि अजुनी कां निजला राया ॥ ३ ॥

-लक्ष्मीकांत

पद ७ वें. (कु. वत्सला कुलकर्णी )

वंदू ईशा गणेशा ।
झडकरी तोडी कटु भव पाशा ॥ धृ० ॥

चरणी तुझ्या विनत झालो ।
पुरवि आस आमुचे जगदीशा ॥ १ ॥

—वेचलेकर

---

पद ८ वें. (मा. भास्कर केळकर, )

उघडा उघडा उघडा हो कोणी नयना ॥ धृ० ॥
जनता सारी दीनची झाली अन्ना वांचोनी ।
उद्योग नाहीं धंदा नाहीं पाहीना कोणी ॥ १ ॥
मॅट्रीक झालो बी. ए. बी. टी. झालो मी टी, डी. ।
पैसा गेला. भेंदूही गेला, झालो एम्. ए. डी. ॥ २ ॥
जातां कोठें नोकरीं साठीं कर्म ही जोड्यांशीं ।
तेल लावीतें भेट न होते हात देवाशीं ॥ ३ ॥
कपडा नाहीं, लत्ता नाहीं, बायको माहेरी ।
वर्षा कांठीं पोरही होतें, वाढते बेकारी ॥ ४ ॥
खालच्या वरच्या दर्जाचे तें मजेंत राहती ।
मधल्या स्थितीचे लोक सारे, मधेंच लोंबती ॥ ५ ॥
नाटक चाले सिनेमा चाले, हॉटेल जोरांत ।
पंजा जिंकूनी घोडा बसतो, बायको दारांत ॥ ६ ॥
जिकडे नको तिकडे जाते चारी दारांनीं ।
लक्ष्मी आहे चंचल कैशी, गरीबा सोडोनी ॥ ७ ॥
जाईल केव्हां सरूनी आतां दारिद्र दिनाचे ।
होचि कळेना येतील केव्हां दिवस सोन्याचे ॥ ८ ॥

—लक्ष्मीकांत

---

# आर. बी. धुळे ॲन्ड ब्रदर्स,

१ फॅन्सी स्टोअर्स ६०६ बुधवार, पुणें.

२ न्यू फॅन्सी स्टोअर्स,

लक्ष्मीरोड, किताब बिल्डिंग पुणें.

---

## सातारचे प्रसिद्ध मिठाईचे दुकान

सातारी पेढे, आंब्याची बर्फी व इतर मिठाई मिळेल.

**दुर्गाप्रसाद मोदी.**

केदारी बिल्डिंग, लक्ष्मीरोड, पुणें २.

---

मनाचे प्रसन्नतेंसाठीं

मंगल, पवित्र व सुवासिक वातावरण उत्पन्न करणारी अस्सल

## चंदनी उदबत्ती वापरा.

चंदनी उदबत्तीचे आद्य उत्पादकः—

**शुक्रे सुगंधीः — फुलांचे व्यापारी.**

दत्तमंदिराजवळ, पुणें २.

---

## कल्याण कंपनी.

श्री विठ्ठल मंदिराजवळ, ४६० बुधवार.

जाव्हा स्पिरीट, अमेरिकन केरोसीन, प्रायमस स्टो.

पेट्रोमॅक्स बत्त्यांचे व्यापारी.

आमचे फिरते गाडीवर घासलेट मिळेल.

☞ पेट्रोमॅक्स बत्त्या भाड्यानें मिळतील. ☜

स्थल प्रत
सं. का०द नं ३७०३
ता. २१।१०।३५
ठा. पो.

पद ९ वें. (कु. इंदू आवचट)

सोडी देवा अतां । मजला त्रास जाहला ॥ धृ० ॥
वांचवि तूं प्रभो । बेकारीतूनी ।
अंत किती पाहसी दयाळा ॥ १ ॥

—लक्ष्मीकांत

---

पद १० वें. (कु. कुसूम अकोलकर)

स्वराज्य लाभो सकलां देवा ।
विनाश पावो पारतंत्रता ॥ धृ० ॥
अंधःकार हा कधींचा देवा ।
अजुनी सोडीना या भूमीला ॥ १ ॥
किती पहाता अंत दयाळा ।
हात जोडितो दावी प्रकाशा ॥ २ ॥

नोंद नं ७७२८

—लक्ष्मीकांत

---

पद ११ वें. (कु. शकुंतला शिर्के)

तुज सम मजासि नसें जगीं त्रातां ।
देवा तव पदीं होई लीन सदा मन ॥ धृ० ॥
हे गणनाथा नित सुख दाता ।
भक्त जनासि मोक्ष विधाता ।
तुजविण विनवूं कुणा भगवंता ॥ १ ॥

—वेचलेकर

---

पद १२ वें. (कु. प्रमिला वाघोलीकर)

कृपा करा तुम्ही मंगल मोरया ॥ धृ० ॥
किती मी विनवूं देवा तुजसी ।
मार्गची दावा मुक्त कराया ॥ १ ॥

फॅन्सी प्रिंटेड पातळें मिळण्याचे एकच ठिकाण.

# इंडियन क्लॉथ स्टोअर्स,

लक्ष्मीरोड पुणें शहर.

---

## ❋ लाड ॲन्ड सन्स, ❋

पुण्यांतील अधिकृत एजन्टस्.

मुंबईंत पहिलीच व एकच
व्हिट्रो फाईड एनॅमल फॅक्टरी
कोटकरएनॅमल वर्क्स.

यंग इंडिया ग्रॅमोफोन रेकार्डस्
व सर्व प्रकारचे रेकॉर्डस् व
ग्रॅमोफोनचे व्यापारी

१८० व्यंकटेश भुवन लक्ष्मीरोड, पुना २.

---

## कविटकर ॲन्ड सन्स.

# कापडाचे व्यापारी.

तुळशीबाग पश्चिम दरवाज्यासमोर, पुणें २.

---

## Prof. M. R. Hirve,

O. M. T. C. A. ( Lon. )

TAILOR & OUTFITTER.

## प्रो. एम्. आर. हिरवे,

ओ. एम्. टी. सी. ए. ( लंडन )

४४० बुधवार, विठ्ठल मंदिराजवळ, पुणें २.

मातृभूमी ही पंकी रुतली ।
धांवा दयाळा तिज सोडाया ॥ २ ॥

———  -लक्ष्मीकांत

पद १३ वें (कु. वत्सला अकोलकर)

विनति देवा मम ऐकोनि ।
तव पद दर्शन देसी न कैसे ।
कां न उमज मतिला अजुनि ॥ धृ० ॥
हांक गजाची येता कानीं ।
संकट काळीं भक्ता भेटुनी ।
भयहारी ऐसा महिमा असुनि ॥ १ ॥

———  -वेचलेकर

पद १४ वें.(कु. सिंधू आराध्ये)

मधू सुदना किती मी विनवूं ।
जनताही दिनची झाली ॥ धृ० ॥
तरी अजूनी नयन कां झांकीशीं ।
सांग देवा राया ॥ १ ॥

———  -लक्ष्मीकांत

पद १५ वें. (कु. वत्सला कुलकर्णी)

विनवित पदीं ही बाला ।
सौख्य देई सकलाला ॥ धृ० ॥
या वांचूनी याचना अन्यना दयाळा ।
तुजविण पुरविल कोण । आंस जगपातला ॥ १ ॥

———  -वेचलेकर

**पद १६ वें.** ( कु. सुशिला आवचट )

राधा वर कारो का न । गैल रोके मानी ॥ धृ० ॥
सखिया जल भर न गई ।
देख रूप छबित भई ।
मनमे तव सकुच रहि ।
देख छबि कनाई । गैल रोके मानी ॥ १ ॥

---

**पद १७ वें.** ( कु. वत्सला कुलकर्णी )

मुख मोर मोर मुसे कहत जात ।
हत छबेली नार करपत सुहात ॥ धृ० ॥
काहो किया सिया रसेली मन भाई ।
या बिचवा सुंदर सुख लाई ।
चली जात सब सखिय साथ ॥ १ ॥

---

**पद १८ वें.** ( मा. देवीदास दाणी )

पेंद्यासाठीं पेंद्यासाठीं । धांवत येई जगजेठी ॥ धृ० ॥
जगांत नसें मज कोणी । सखाही तुझ्या वांचोनी ।
घे धांव अतां जाणोनी । खेळण्या साठीं ॥ १ ॥

---

**-लक्ष्मीकांत**

**पद १९ वें.** ( रासक्रीडा )

याहो खेळूं साऱ्या गवळणी । घेऊं हारी फेर धरूनी ।
सुंदर कितितरी खेळचि हा । अतिशय सुखकर खेळाया ॥ धृ० ॥
कृष्णही काळा यशोदेचा । प्राण जीवाचा अति राधेचा ।
बंधूहि प्रिय या गोपींचा । खेळशीं किती तूं यदुराया ॥ १ ॥

पाहूं आतां खेळ तुझा । सुखदायक जो या काला ।
ऐका जनाचे करूनी मनाचे । ध्याहो मानुनी सुखराया ॥ २ ।!

—— —लक्ष्मीकांत

**पद्द २० वें** ( कु. वत्सला कुलकर्णी, कु. प्रमिला वाघोलीकर )

तव पदीं ही करी प्रार्थना ।
सुगुणा तारक दिना । तूं दयाघना ॥ धृ० ॥
धांव मधुसुदना ॥ मोहना ॥ सुखवीया बुध जना ।
पावना, दास अनंतावरी करी करूणा ॥ १ ॥

—— —घेल्हाळ

मराठी ग्रंथ संग्रहालय.
स्थळ प्रत
सं. ......... नं. .........
ता. .........
ठाणे.

प्रकाशकः—**वामन यशवंत बरडे**, २१२ रास्तापेठ, शिराळशेट चौक, पुणें.
मुद्रकः—**बी. व्ही. गोरे**, गोरे प्रिन्टिंग प्रेस, ७७३ सदाशिव पेठ, पुणें २.

## —: आभार :—

आज तीन वर्षें निरनिराळ्या रूपानें सहाय्य करणाऱ्या सर्व स्त्रीपुरुषांचे तसेंच मेळ्यांतील मुलांमुलींच्या पालकांचे, गणेशोत्सव बांधवांचे आभारी आहोत. तसेंच मेळ्याला सल्ला देणारे इंग्लंडहून आलेले डॉ. व्ही. के. देव व फोटोग्राफर बी. जी. पारगे यांचेही आभारी आहोत. तसेंच गरीबींतील मानपान सोडून श्रीमंतीतील अपमानाची लज्जत घेण्याकरितां दुसऱ्या मेळ्यांत गेलेल्या आमच्या जुन्या मुलींचे व पाठविणाऱ्या पालकांचेही आभारी आहोत. तसेंच जाहिरातदारांचे व आज तीन वर्षें आमच्या पद्यावल्या थोड्या खर्चात छापून दिल्याबद्दल श्री० बी. व्ही. गोरे यांचेही आभारी आहोत. आणि शेवटीं श्रीगणरायाच्या चरणीं येवढींच प्रार्थना आहे. कीं,

घडो जन सेवा । निरंतर देवा ।
हाचि मज द्यावा । आशिर्वाद ॥

—लक्ष्मीकांत.

REFBK-0005372
REFBK-0005372
4362

फोटोचे दर कमी केले आहेत !     चवकशी करा ! !

दिवसा व रात्रौ फोटो काढण्याचे

१ च ठिकाण

## एस्. एम्. साळवी, फोटो आर्टिस्ट

किर्लोस्कर थिएटर, पुणें.

लहान मुलांकरितां नवीन अमेरिकन पद्धतीवर

## १॥ रुपयांत चार फोटो

निरनिराळे पोझिशनमध्यें उत्तम काढून मिळतील.

## डी. रामचंद्र आणि कंपनी,

लायसेन्स्ड इलेक्ट्रिकल कॉन्ट्रॅक्टर्स

पुष्करणीचे हौदाजवळ, पुणें. २.

आमचेकडे सर्व प्रकारचे इलेक्ट्रिकचे फिटिंग, वायरिंग वगैरे. माफक दरांत व शास्त्रोक्त पद्धतीनें आमच्या खास देखरेखीखालीं केलें जातें. तसेंच स्टँडस्, फॅन्सी सेटस्, बल्बस्, वगैरे सर्व तऱ्हेचा माल योग्य भावांत मिळतो.